# ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर

E-mail : ecovillage_ahmednagar@rediffmail.com

आदेश क्रमांक.साप्रवि-२/ग्रापं-९/२३०/२०२५, दिनांक:-...../०३/२०२५

<u>प्रशासकीय मान्यता</u>

विषय:- सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी ग्रामपंचायतीला जन सुविधांसाठी विशेष अनुदान <u>योजनेंतर्गत निवड करण्यात आलेल्या विकास कामांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत.</u>
**(मौजे पळशी, ता पारनेर व इतर ०९ कामे रक्कम रु.१००.०० लक्ष)**

वाचा:- १.ग्रा.वि.व.ज.सं.विभाग, शासन निर्णय क्र - ददभू-२०१०/प्र.क्र.६२/पंरा-६, दि:-१६/०९/२०१०
२.ग्रा.वि.व.ज.सं.विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र-जनसु-२०१६/प्र.क्र.२१०/यो.६, दि:-३/०१/२०१७
३.ग्रा.वि.विभाग, शासन निर्णय क्र: जनसु-२०१७/प्र.क्र.१११/यो-०६, दि:-२५ जानेवारी, २०१८
४.नियोजन विभाग, शासन निर्णय क्र:जिवायो १००७/प्र.क्र.३९/का-१४४४, दि:-१६/०२/२००८
५.नियोजन विभाग, शासन निर्णय क्र:डिएपी-१०१४/प्र.क्र.२९५/का.१४८१, दि:-१७/१२/२०१४
६.ग्रा.वि.विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक:झेडपीए-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९, दि:-०६/०९/२०२१
७.ग्राम विकास विभाग यांचेकडील राजपत्र दि:-१३/०९/२०२२

सन **२०२४-२०२५** या आर्थिक वर्षासाठी ग्रामपंचायतीला जन सुविधांसाठी विशेष अनुदान योजने अंतर्गत सोबतचे परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या कामांना संदर्भीय शासन निर्णयान्वये मंजुरी दिलेली आहे.

ग्रामपंचायतीला जन सुविधांसाठी विशेष अनुदान योजनेंतर्गत ग्राम विकास विभागाकडील उपरोक्त संदर्भ ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शासन निर्णयानुसार प्रदान करणेत आलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता नियम १९६८ चे नियम ४ परिशिष्ट २ अन्वये सोबतचे परिशिष्टामधील नमुद कामांना कामनिहाय रक्कमेस खाली नमुद केलेल्या अटी व शर्तींना अधीन राहून प्रशासकीय मान्यता देणेत येत असुन एकुण रक्कम रुपये १००.०० लक्ष निधी मंजुर करणेत येत आहे.

ग्रामपंचायतीला जन सुविधांसाठी विशेष अनुदान योजने अंतर्गत उपलब्ध तरतुदीमधुन सोबतचे परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या कामांना निधी मंजुर केलेला असुन, मंजुर निधीच्या मर्यादेत सदर कामांस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सदर मंजुर कामांच्या यादीत संदर्भाधीन शासन निर्णय क्र १ ते ३ अन्वये विहीत केलेल्या कामांव्यतिरिक्त कामे असतील तर अशी योजनाबाह्य कामे तसेच जी कामे जागेचा अभाव, इतर योजनेंतर्गत या आधी मंजुर असतील किंवा इतर काही कारणांमुळे सुरु करणे शक्य नसतील अशा कामांची शहानिशा करुन त्या कामांची यादी तात्काळ जिल्हा परिषदेस सादर करणेची सर्वस्वी जबाबदारी गट विकास अधिकारी (संबधित पंचायत समिती) यांची राहील.

सदर बाबींवर होणारा खर्च मागणी क्र ओ-४२, अंतर्गत २५१५ - इतर ग्रामविकास कार्यक्रम (२५१५१३३६) ग्रामपंचायतींना जन सुविधांसाठी अनुदाने ३१, सहाय्य अनुदाने (वेतनेत्तर), जि.प.संकेतांक २०४२५ या लेखाशिर्षाखाली सन **२०२४-२५** या आर्थिक वर्षाच्या तरतूदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. सदर आदेशान्वये मंजुर करण्यात आलेली सोबतच्या परिशिष्टामधील नमुद कामे **दि:-३१ मार्च २०२६ पर्यंत** पुर्ण करण्यात यावीत. तसेच सदरचे अनुदान सन

२०२४-२५ या आर्थिक वर्षात मंजुर करणेत आलेले असलेने, सदरचा निधी खर्च करणेसाठी माहे **मार्च २०२६** अखेर मुदत राहील.

<u>अटी व शर्ती:-</u>

१.सदर प्रशासकीय आदेश मिळताच गट विकास अधिकारी (संबधित पंचायत समिती) यांनी मंजुर कामांचे प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह तयार करुन घेवुन (अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेसह) आपले स्तरावर कायमस्वरुपी जतन करुन ठेवावेत.

२.सदर प्रशासकीय मान्यता प्रदान केलेल्या सर्व कामांसाठी जिल्हा परिषदेच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार तांत्रिक मंजुरी, निविदा काढणे / स्वीकारणे इत्यादी बाबतची कार्यवाही सक्षम प्राधिका-याकडुन करुन घेण्याची जबाबदारी ग्रामसेवक (संबधित ग्रामपंचायत) / गट विकास अधिकारी (संबधित पंचायत समिती) यांची राहील.

३.सदर योजनेंतर्गत निवड करण्यात आलेल्या कामाचा समावेश संबधित ग्रामपंचायतीच्या गाव नियोजन आराखड्यात असणे आवश्यक असुन सदर कामास ग्रामसभेच्या सहमतीनंतर ग्रामपंचायतीने प्रशासकीय मान्यता द्यावयाची आहे.

४.सदर मंजुर कामांना कार्यारंभ आदेश हा उक्त नमुद कालमर्यादेतच **(दि:-३१ मार्च २०२६)** देवुन, विहित कालावधीतच संबधित कामे पुर्णत्वास आणावीत. विहित केलेल्या कालावधीनंतर कार्यारंभ आदेश दिल्याचे निदर्शनास आल्यास संबधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

५.सदर मंजुर निधी त्याच कामासाठी खर्च करावयाचा असुन, सदरील कामे मंजुर अनुदानाच्या मर्यादेतच पुर्ण होतील याची दक्षता घेण्यात यावी व जास्तीचे आर्थिक दायित्व निर्माण करु नये. मंजुर किंमतीपेक्षा जास्त होणारा खर्च संबधित ग्रामपंचायतीस करावा लागेल.

६.सदर प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली सर्व कामे इतर योजनेतुन मंजुर नाहीत / प्रस्तावित नाहीत किंवा यापुर्वी झालेली नाहीत याची खातरजमा करणेची जबाबदारी ग्रामसेवक (संबधित ग्रामपंचायत) / उपअभियंता (संबधित उपविभाग) / गट विकास अधिकारी (संबधित पंचायत समिती) यांची राहील. तसेच सदर कामे पुर्ण झालेनंतर त्याची देखभाल दुरुस्ती ज्या त्या ग्रामपंचायतींनी करावयाची आहे.

७.सदर मंजुर कामे ग्रामपंचायतीच्या जागेतच करावयाचे असुन जागेअभावी काम रद्द होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी संबधित ग्रामपंचायतीची राहील. मंजुर काम मंजुर ठिकाणीच करणेत यावे. तसेच मंजुर काम जिल्हा परिषद / सरकार जागेत करावयाचे असल्यास, जिल्हा परिषदेची / मा.जिल्हाधिकारी यांची परवाणगी घेणे बंधनकारक राहिल.

८.ग्रामपंचायत कार्यालय इमारतीचे नवीन बांधकाम असल्यास ते शासन निर्णय क्रमांक:ग्रापंई-२०१३/प्र.क्र.१८९/पंरा-७ दि:-३०/०१/२०१४ मधील नमुद नमुना आराखडा क्र.एडीएम/५५२६, नकाशा क्र.३ नुसारचं करण्यात यावे.

९.सदर मंजुर कामांचा दर्जा व गुणवत्ता ही शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मानंकाप्रमाणे असावीत. ती तशी न नसल्यास ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक व कंत्राटदार / संबधित यंत्रणा यांना सामुहिक व वैयक्तिकरित्या जबाबदार धरण्यात येईल.

१०.सदर मंजुर सर्व कामांची राज्य गुणवत्ता निरिक्षक (एस.क्यु.एम) यांचेकडुन शासन निर्णयानुसार तपासणी करुन घेण्यात यावी.

११.सदर कामाबाबत जनतेच्या तक्रारी उद्भवल्यास संबंधित जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समक्ष जागेवर तक्रारीची शहानिशा करावी किंवा स्वतंत्र गुणवत्ता नियंत्रकाकडून फेरतपासणी करावी. जर कामाचा दर्जा निकृष्ट आढळून आल्यास संबंधित तपासणी यंत्रणा जबाबदार राहील.

१२.सदर योजने अंतर्गत होणा-या कामांचे सामाजिक निरिक्षण करण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ४९(१) मधील तरतूदीनुसार ग्रामसभा ग्राम विकास समित्या गठित करू शकतात. त्यानुसार सदर योजनेसाठी ग्रामसभेत एक ग्राम विकास समिती गठित करून त्याव्दारे सदर योजने अंतर्गत होणा-या कामांचे सामाजिक निरिक्षण करावे व सदर अहवाल इकडेस सादर करावा.

१३.उपरोक्त संदर्भीय तसेच प्रचलित शासन निर्णयान्वये, शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार सर्व अटी व शर्ती लागु राहीतील.

१४.सदर कामे पुर्ण झालेवर काम पुर्णत्वाचे दाखले तात्काळ जिल्हा परिषदेस सादर करणेत यावेत.

१५.तालुका स्तरावरील गट विकास अधिकारी / उपअभियंता यांनी सदर कामांची वेळोवेळी पहाणी करून मासिक प्रगती अहवाल इकडेस सादर करावयाचा आहे.

१६.सदर आदेशासोबतच्या परिशिष्टामध्ये नमुद केलेली कामे माहे **मार्च २०२६** पर्यंतच पुर्ण करुन त्यावरील मंजुर निधी जिल्हा परिषदकडुन माहे **मार्च २०२६** पर्यंतच प्राप्त करुन घेण्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित एजन्सी / यंत्रणेची आहे. तसेच सदर कामांचा निधी ग्रामपंचायतींना गट विकास अधिकारी यांचे मार्फत वितरीत करणेत येईल.

१७.सदर आदेशासोबतच्या परिशिष्टामधील नमुद केलेली विकास कामे हाती घेण्यापुर्वी संबधित क्षेत्रात जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका / पोट निवडणुकांसाठी आचारसंहिता अंमलात नाही याबाबत ग्रामसेवक (संबधित ग्रामपंचायत) / गट विकास अधिकारी (संबधित पंचायत समिती) यांनी खात्री करावी. तसेच सदर कामे दर्जेदार व चांगल्या प्रतीचे असल्याबाबत विहित समिती / संबधितांकडुन खात्री करुन घेण्यात यावी. कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही, याची सर्व संबधितांनी दक्षता घ्यावी. याबाबत संबधित गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांनी विशेष दक्षता घ्यावी, अन्यथा कसुरदारांवर जिल्हा परिषद स्तरावरुन कारवाई करण्यात येईल.

१८.सदर कामे पुर्ण झालेनंतर शासकीय कपाती (रॉयल्टी, लेबर सेस, आयटी टॅक्स, सर्व्हीस टॅक्स, जीएसटी इ.) करण्यात येवुन त्यांचा मुदतीत भरणा करणेचे जबाबदारी संबधित विभागाची / यंत्रणेची राहील.

**सोबत:- परिशिष्ट**

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 19-03-2025 16:15:49

**प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

**प्रति,**

१.संबधित ग्रामपंचायत, व्दारा:-गट विकास अधिकारी, पंचायत समिती-------------------

प्रत :- जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, अहिल्यानगर.

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर.

प्रत :- कार्यकारी अभियंता, जि.प.सा.बा.(उत्तर/दक्षिण)/ग्रा.पा.पु/ल.पा.विभाग, अहिल्यानगर.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती----------------------

प्रत :- उपअभियंता, जि.प.सा.बा/ल.पा/ग्रा.पा.पु, उपविभाग-------------------------

विषयः- सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी ग्रामपंचायतीला जन सुविधांसाठी विशेष अनुदान योजनेंतर्गत निवड करण्यात आलेल्या विकास कामांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

(मौजे पळशी, ता पारनेर व इतर ०९ कामे रक्कम रु.१००.०० लक्ष)

आदेश क्रमांक.साप्रवि-२/ग्रापं-९/२३०/२०२५, दिनांकः-...../०३/२०२५ आदेशासोबतचे परिशिष्ट (रु.लाखात)

| अ.क्र | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १ | मौजे पळशी ता पारनेर येथे हिंदु स्मशानभुमी विकास करणे | १५.०० |
| २ | मौजे भगुर ता शेवगांव येथे स्मशानभुमी विकास करणे | १०.०० |
| ३ | मौजे निंबोडी (मल्हार) ता नगर येथे गावांतर्गत गवळी मळा रस्ता करणे | १०.०० |
| ४ | मौजे बहिरवाडी ता नगर येथे गावांतर्गत जगदाळे वस्ती (वाघवाडी) रस्ता करणे | १०.०० |
| ५ | मौजे हिवरे झरे ता नगर येथे गावांतर्गत पाण्याची टाकी खंडोबा माळ ते रोडे वस्ती रस्ता करणे | १०.०० |
| ६ | मौजे हिवरे झरे ता नगर येथे गावांतर्गत नाना साळवे घर ते टकले वस्ती रस्ता करणे | १०.०० |
| ७ | मौजे रत्नापुर ता जामखेड येथे गावांतर्गत शरदकाका भोर वस्ती रस्ता करणे | १५.०० |
| ८ | मौजे निमगांव वाघा ता नगर येथे गावांतर्गत प्रियदर्शनी डेअरी ते चौरे वस्ती रस्ता करणे | १०.०० |
| ९ | मौजे गारखिंडी ता पारनेर येथे ग्रामपंचायतीच्या आवारामध्ये परिसर सुधारणा करणे | ५.०० |
| १० | मौजे गारखिंडी ता पारनेर येथे स्मशानभुमी विकास करणे | ५.०० |
| | एकुण | १००.०० |

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 19-03-2025 16:14:15

प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर